स्थायी समितीच्या **शनिवार दिनांक 30–08–2014** रोजी **सकाळी 11–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 5. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 6. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 7. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 10. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 11. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 12. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 13. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 2. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 3. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 160 :– प्रभाग क्रमांक 64,अयोध्यानगर, लाडीकर ले आऊट महालक्ष्मीनगर या भागात पावसाळी नालीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 8 निविदांपैकी मे. रफीक अहमद रियाज अहमद यांची प्राकलनीय दरांपेक्षा 17.04 प्रतिशत ने कमी दरांची रु. 29,03,598/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 161 :– प्रभाग क्र. 24 (अ) हजारीपहाड येथे सि.सी. रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. 26,00,000/– (अक्षरी सव्वीस लक्ष फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 162</u> :– नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोन कार्यालयांमध्ये दैनंदिन कामाकरीता लागणाऱ्या संगणक कंझुमेबल्स व साहित्याच्या खरेदीसाठी दरकरार करण्याबाबत स्थायी समिती ठराव क्र. 16, दिनांक 12.05.2014 अन्वये उपरोक्त कामाकरीता ई–निविदा बोलावल्या असता, 1) मे. गॅलक्सी एंटरप्रायजेस, नागपूर 2) मे. सुदर्शन पेपर कंन्व्हटींग वर्क्स, नागपूर 3) मे. पी ॲन्ड जी सेल्स कार्पोरेशन, नागपूर 4) मे. गुरूकृपा स्टेंशनर्स ॲन्ड प्रिंटर्स, नागपूर या चार निविदा प्राप्त झाल्या. या चार निविदांमधील प्राप्त निम्नतम दर करारासाठी विचारार्थ घेण्यात आले. वाटाघाटीनंतर या निम्नतम दरांपेक्षा 4 टक्के कमी दरांवर दरकरार करण्याची संमती चारही निविदाकारांनी दिलेली आहे.

सबब निविदांमधील निम्नतम दरांपेक्षा 4 टक्के कमी दरांवर, उपरोक्त चार निविदाकार यांचे सोबत दरकरार करण्यास व यासाठी येणाऱ्या अंदाजे रू. 100 लक्षच्या वार्षीक खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एक वर्षासाठी दरकरार करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 163</u> :– प्रभाग क्र. 34 अ म्हाडा कॉलनी येथे नागनदीला संरक्षण भिंत बांधकामास्तव रू. 49,88,629/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व पद क्र. A43901370812 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 164</u> :– प्रभाग क्र. 56 ब अंतर्गत समर्थ नगर, नवजिवन कॉलोनी, गजानन नगर, प्रगती कॉलोनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.एम.ए. कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 1.96 टक्के कमी दराची रू. 3915597/– (एकोनचाळीस लक्ष पंधरा हजार पाचशे सत्यानव) रकमेची निम्नतम निविदा स्वकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. हे काम पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रू. 3915597/– पर्यंतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 165</u> :– प्रभाग क्र. 67 ब मानेवाडा नाल्याची शाहू नगर, एकमत नगर येथील नाल्याची संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 5 निविदांपैकी मे. आर.डी. साहारे यांची प्राकलनीय दरांपेक्षा 15.58 प्रतिशत ने कमी दरांची रू. 53,81,599/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 166</u> :– प्रभाग क्र. 34 मधील भरतवाडा गावात सी.सी. रोडचे बांधकाम करण्यास्तव रू. 28,53,503/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व पद क्र. A42001374602 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 167</u> :– नागपूर शहरातील वाहतुक पोलीस उत्तर व इंदोरा झोन अंतर्गत मुख्य चौरस्त्यावर कॅन्टीलीव्हर ओव्हरहेड साईनेझ सिस्टीमची उभारणी करण्याच्या कामास्त तयार केलेल्या रू. 53,62,700/– (अक्षरी त्रेपन लक्ष बासष्ठ हजार सातशे रूपये) रकमेच्या प्राकलनास पद क्र. A22001330802 (681) अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 168</u> :— प्रभाग क्र. 15 (ब) वंजारीगाव व कळमना गाव येथील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिट काम करण्यास्तव मे. पि.व्ही. चाफले यांची प्राकलनास दरांपेक्षा 23.99 टक्के प्रतिशत ने कमीची निविदा रू. 25,07,859/— (अक्षरी पंचविस लक्ष सात हजार आठशे एकोणसाठ फक्त) राशीच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 169</u> :— मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला त्यानंतर प्रस्तावित ठरावास स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली. उपरोक्त ठराव म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

## —: ठराव :—

आर्थिक वर्ष 2013—14 मध्ये अतीमुसळधार पावसामुळे शहरातील रस्त्यांची परिस्थिती अतिशय दयनिय झाली होती. त्या कार्यकाळातील रस्त्यांची अनेक प्रकरणे आयुक्तांचे सुधारित अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर निधी अभावी प्रलंबित राहीली होती. ती सर्व प्रकरणे यावर्षी च्या अर्थसंकल्पातून पूर्ण करावयाची होती. परंतू मागील रस्त्यांची प्रकरणे व यावर्षीचे प्रस्तावित अत्यंत खराब रस्त्यांची सुस्थिती व दुरुस्ती करणे आवश्यक असल्यामुळे खालील स्पष्ट केलेल्या पदाअंतर्गत निधीची कमतरता असल्यामुळे ही स्थायी समिती खालील पदाअंतर्गत पुनःसमायोजन करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

करिता या प्रस्तावास स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच या प्रस्तावास म.न.पा. महासभेची मंजूरी आवश्यक असल्यामुळे ही सभा महासभेस हा प्रस्ताव पाठविण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते.

# स्थायी समिति द्वारे प्रस्तावित फेरबदल

| **FUNCTION DISCRIPTION** कार्यात्मक समुह विवरण गौण शिर्ष | अर्थसंकल्पीय पद क्रमांक | | | विशदीकरणात्मक व्यय शिर्ष ( प्राथमिक व्यय घटक ) **Illustrative Of Other FUNCTION GROUP** | प्राधिकृत विभाग | 2014–2015 प्रस्तावित स्थायी समिति द्वारा सूचित | 2014–2015 प्रस्तावित घट | 2014–2015 प्रस्तावित वाढ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| Roads and Pavements & Others Civic Works रस्ते व फरसबंदी आणि इतर नागरी विकास कार्य | **A2** | **20013** | **30802** | शहरातील इतर रस्त्याचे डांबरीकरण सुस्थीती व दुरूस्ती करणे | **P.W.D** | **3500.00** | **0.00** | **1000.00** | **4500.00** |
| | **A2** | **20013** | **30803** | पंडित दिनदयाल उपाध्याय अंतर्गत रस्ते सुधार कार्यक्रम (रस्त्याचे डांबरीकरण ,सुस्थीती व दुरूस्ती करणे) (रु. 30 लक्ष प्रती प्रभाग प्रमाणे रु. 2130 लक्ष तसेच प्रभाग क्र. 72 करिता रु. 45 लक्ष राखीव व मनोनीत सदस्यांकरिता प्रत्येकी रु. 15 लक्ष प्रमाणे रु. 75 लक्ष राखीव तरतुद) | **P.W.D** | **3250.00** | **0.00** | **600.00** | **3850.00** |
| Storm Water & Drains पावसाळी नाले व नाली जलनिस्सारण | **A4** | **24013** | **70826** | पावसाळी नाले निर्माण व विस्तार | **P.W.D.** | **400.00** | **0.00** | **400.00** | **800.00** |

| FUNCTION DISCRIPTION<br>कार्यात्मक समुह विवरण<br>गौण शिर्ष | अर्थसंकल्पीय पद क्रमांक | | | विशदीकरणात्मक व्यय शिर्ष ( प्राथमिक व्यय घटक )<br>**Illustrative Of Other FUNCTION GROUP** | प्राधिकृत विभाग | 2014–2015 प्रस्तावित | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | स्थायी समिती द्वारा सूचित | घट | वाढ | |
| १ | २ | | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| Capital Work Of Roads and Pavements & Others Civic Works<br>रस्ते व फरसबंदी आणि इतर नागरी विकासा करीता भांडवली निर्माणकार्य व व्यय | **A4** | **20014** | **70511** | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रस्ते विकास कार्यक्रम (सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते निर्माण) | **HOT MIX** | **9000.00** | **2000.00** | **0.00** | **7000.00** |
| | | | | प्रस्तावित घट व वाढ महसुली व्यय – अ – 2 तसेच भांडवली व्यय – अ – 4 एकुण व्यय | | **16150.00** | **2000.00** | **2000.00** | **1650.00** |

सुचक – हस्ता/– श्री. हरिष दिकोंडवार
अनुमोदक – हस्ता/– श्री. सागर लोखंडे
हस्ता/– श्री. सुरेश तळवेकर
हस्ता/– श्रीमती पल्लवी श्यामकुळे
हस्ता/– सौ. सविता सांगोळे
हस्ता/– सौ. सिंधु उईके
हस्ता/– सौ. भावना प्र. ढाकणे

<u>ठराव क्रमांक 170</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर